महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# जाहीर सूचना

## शिकाऊ उमेदवार अधिनियम -१९६१ अन्वये एक वर्ष (२०२३-२०२४)करीता आय.टी.आय शिकाऊ उमेदवार म्हणून भरती प्रक्रीया संबंधी

महावितरण विभागीय कार्यालय साकोली यांच्या आस्थापनेवरील (सत्र-२०२३-२४) विजतंत्री/तारतंत्री या प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवार पदावर एकूण ३१ जागा भरावयाची आहे. या करीता एस.एस.सी व आय.टी.आय उत्तीर्ण ( विजतंत्री/तारतंत्री) NCTVT अंतर्गत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचे Designsted Trade हा ELECTRICIAN/ WIREMAN आहे तसेच Apprentices Training Period एका वर्षाकरीता (सत्र-२०२३-२४) असून दि.१९.१२.२०२३ पर्यंत **www.apprenticeshipindia.gov.in** या संकेतस्थळावरुन आस्थापना क्र. **(E05202701658)** वर ऑनलाईन (Online) अर्ज मागविण्यात येत आहे.

• Designsted Trade हा ELECTRICIAN/WIREMAN करीता शिकाऊ उमेदवारीचा कालावधी हा एक वर्षाकरीता (सत्र - २०२३-२४) असून खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | ट्रेडचे नाव | भरावयाच्या जागा |
|---|---|---|
| १ | विजतंत्री ( ELECTRICIAN ) | २१ |
| २ | तारतंत्री ( WIREMAN ) | १० |

१. शैक्षणिक अर्हता: महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT) नवी दिल्ली मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून विजतंत्री/तारतंत्री या व्यवसायात उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
२. वयोमर्यादा: १८ ते ३८ वर्ष, मागासवर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथीलक्षम.
३. प्रशिक्षण कालावधी: ०१ वर्ष राहील.
४. विद्यावेतन: नियमाप्रमाणे लागू राहील.
५. पद कमी जास्त करण्याचा व भरती प्रक्रीयेशी निगडीत असलेले सर्व अधिकारी व्यवस्थापन राखुन ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारांस कळविल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.
६. एस.एस.सी./एच.एस.सी उत्तीर्ण गुणपत्रिका व सदर प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत.
७. आय.टी.आय उत्तीर्ण गुणपत्रिका (चार सेमिस्टर) व NCTVT प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत.
८. उमेदवाराचे मागास प्रवर्गात अर्ज केला असलेल्यास जात प्रमाणपत्राची साक्षांकीत केलेली छायांकीत प्रत.
९. भरती प्रक्रीये दरम्यान उमेदवाराचे राजकीय किंवा इतर अधिकाऱ्यांकडून दबाव आणल्यास आपली उमेदवारी रद्द करण्यात येइल याची नोंद घ्यावी.
१०. सदर प्रकिया ही भंडारा जिल्ह्यातील उमेदवारांसाठी मर्यादीत आहे. (आधार कार्डमधील नोंदिनुसार)

• उमेदवारांनी ऑनलाईन (Online) अर्ज करतांना पोर्टलवर आवश्यक मुळ दस्ताऐवज स्कॅन करुन योग्य रितीने अपलोड करणे बंधनकारक आहे. तसेच ऑनलाईन अर्ज केलेल्या कागदपत्राची प्रत या कार्यालयास दि. २०.१२.२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करणे बंधनकारक राहिल. दि. १९.१२.२०२३ पर्यंत (Online) पध्दतीने अर्ज न केल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.
• शिकाऊ उमेदवारांची निवड ही आय.टी.आय.गुणांच्या टक्केवारी नुसारच Merit प्रमाणे व वरील अटी व शर्तीच्या अधिक राहुन प्रवर्गनिहाय निवड केले जाणार आहे.
• कागदपडताळणी दि.२८.१२.२०२३ ला असुन ठरविलेल्या कालावधीत ऑनलाईन अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी ठरविलेल्या दिनांकास खालील पत्ता वर हजर रहावे.
• शिकाऊ उमेदवार यांची निवड यादी कागदपडताळणी नंतर प्रसारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**कार्यकारी अभियंता,**
**सं.व.सु.विभाग,महावितरण,साकोली**

पी.आर.ओ.क्र. ७७ दि.१२.१२.२०२३